॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ९५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


✻ सुविचार ✻

वेळेचं महत्त्व ओळखलं की यश जवळ येतं.

# अहिल्यानगर जिल्हा बँकेसाठी २३९ अर्ज वैध

**शंकरराव गडाख, देशमुख बिनविरोध । सुजय विखे, कोल्हे, घुले बिनविरोधच्या मार्गावर । आणखी जागांवर एकमत होण्याची शक्यता**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत २१ जागांपैकी दोन जागा बिनविरोध झाल्या असून, आणखी तीन जागा बिनविरोध होण्याच्या मार्गावर आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २१ ऑक्टोबर असल्याने त्यापूर्वी आणखी किती जागांवर एकमत होते आणि किती मतदारसंघांत प्रत्यक्ष निवडणूक होते, हे स्पष्ट होणार आहे. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राजकीय पातळीवर प्रयत्न सुरू असल्याने उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी नेत्यांची कसोटी लागणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी बुधवारी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली. मंगळवारी रात्री उशिरापर्यंत उमेदवारी अर्जांची छाननी आणि हरकतींवरील सुनावणी सुरू होती. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या वैध उमेदवारांच्या यादीतून निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले.

बिनविरोध निवड झालेल्यांमध्ये ठाकरे गटाचे माजी मंत्री शंकरराव गडाख (नेवासे, सेवा सोसायटी) आणि काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजीतसिंह देशमुख (संगमनेर, सेवा सोसायटी) यांचा समावेश आहे. दोन्ही मतदारसंघांत प्रत्येकी एकच वैध उमेदवारी अर्ज राहिल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.




भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे (राहाता, सेवा सोसायटी), अजित पवार गटाचे माजी आमदार चंद्रशेखर घुले किंवा त्यांच्या पत्नी तथा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्री घुले (शेवगाव, सेवा सोसायटी) आणि भाजपचे माजी आमदार विवेक कोल्हे किंवा त्यांचे वडील बिपीन कोल्हे (कोपरगाव, सेवा सोसायटी) यांच्या मतदारसंघांतही प्रत्येकी दोन उमेदवार शिल्लक आहेत. त्यामुळे माघारीनंतर या जागांवरही बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.

राहाता मतदारसंघात सुजय विखे आणि प्रवरा बँकेचे अध्यक्ष भास्कर निवृत्ती खर्डे यांचे अर्ज शिल्लक आहेत. खर्डे यांचा अर्ज मागे घेतला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे विखे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग सुकर होऊ शकतो.

शेवगावमध्ये चंद्रशेखर घुले आणि राजश्री घुले यांचे अर्ज शिल्लक आहेत. चंद्रशेखर घुले यांची उमेदवारी कायम ठेवून राजश्री घुले यांचा अर्ज मागे घेतला जाण्याची शक्यता आहे. कोपरगावमध्ये बिपीन कोल्हे आणि आमदार विवेक कोल्हे यांचे अर्ज शिल्लक असून, बिपीन कोल्हे यांचा अर्ज मागे घेतला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आमदार विवेक कोल्हे हे बँकेचे माजी संचालक आहेत.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी एकूण ३६९ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननीदरम्यान विविध कारणांमुळे काही अर्ज अवैध ठरले, काही हरकतींमुळे बाद झाले, तर काही उमेदवारांनी एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केले होते. त्यामुळे आता एकूण २३९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, २१ ऑक्टोबरपर्यंत ती चालणार आहे. या कालावधीत विविध मतदारसंघांत माघारीसाठी राजकीय पातळीवर चर्चांना वेग येण्याची शक्यता आहे. माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील अंतिम लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे.

### कोणत्या मतदारसंघात किती उमेदवार?

■ **सेवा सोसायटी :** अकोले १९, जामखेड ३, कर्जत १०, कोपरगाव २, नगर ३, नेवासे १, पारनेर ४, पाथर्डी ३, राहाता २, राहुरी ३, संगमनेर १, शेवगाव २, श्रीगोंदे १०, श्रीरामपूर ४

**शेतीपूरक संस्था :** २८

**बिगरशेती संस्था :** ३७

**महिला मतदारसंघ :** ४४

**अनुसूचित जाती-जमाती :** १२

**ओबीसी :** ४१

**विजाभज-विशेष मागास प्रवर्ग :** १८

### सुजय विखेंविरोधात उच्च न्यायालयात जाणार

■ राहाता मतदारसंघातील माजी खासदार सुजय विखे यांचे विरोधी उमेदवार एकनाथ चंद्रभान घोगरे यांनी विखे यांच्या उमेदवारीवर हरकत घेतली होती. ही हरकत फेटाळण्यात आली. तसेच घोगरे यांच्या उमेदवारी अर्जावरील सूचकाने आपली स्वाक्षरी नाकारल्याने त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला. या दोन्ही निर्णयांविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे एकनाथ घोगरे आणि त्यांचे वकील सुरेश लगड यांनी सांगितले. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे निकालाच्या प्रती मागूनही त्या उपलब्ध झाल्या नसल्याचे वकील लगड यांनी सांगितले.

## SPOT NEWS

### महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ३७ लाख अर्ज

**● मुंबई –** महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून अधिकृत आणि कायदेशीर ओळख मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. ७ ऑक्टोबरपर्यंत तब्बल ३७ लाख ९३ हजार ०५१ अर्ज प्राप्त झाले असून ८९५ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेऊन ६८ हजार ४३६ महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागाकडून नोंदणीला वेग देण्यात येत आहे, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. महाराष्ट्र शासनाने नुकतेच 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा, २०२६' विधेयक मंजूर केले आहे. त्यानुसार महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. ग्रामसभा झाल्यानंतर पुढील १५ दिवसांत पात्र महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वितरित केले जात आहे. विदर्भ, मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर नोंदणी होत आहे.

### ईडीचे केरळममध्ये २० ठिकाणी छापे

**● कोच्ची –** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केरळममधील तीन सहकारी संस्थांमधील अंदाजे ९२ कोटी रुपयांच्या कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून थ्रिसूर, एर्नाकुलम आणि कोझिकोडमधील २० ठिकाणी छापे टाकले. या तपासात अर्बन कोऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये ५५ कोटी रुपये, थेन्नेला सर्व्हिस कोऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये १० कोटी रुपये आणि कुट्टनेलूर कोऑपरेटिव्ह बँकेत २७ कोटी रुपयांची अनियमितता उघड झाली आहे. अधिका-यांनी सांगितले की, मनी लाँड्रिंग आणि आर्थिक फसवणुकीच्या आरोपांखाली ही कारवाई केली जात आहे. ९२ कोटी रुपयांच्या कथित अनियमिततेप्रकरणी ईडीने केरळममध्ये २० ठिकाणी छापे टाकले. तीन सहकारी संस्थांमधील अंदाजे ९२ कोटी रुपयांच्या कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून ईडीने बुधवारी केरळममधील अनेक ठिकाणी छापे टाकले. ईडीची पथके थ्रिसूर, एर्नाकुलम आणि कोझिकोडमधील अंदाजे २० ठिकाणी शोधमोहीम राबवत आहेत.

## दुष्काळासाठी केंद्राची महाराष्ट्राला भरीव मदत : मंत्री अमित शहा

**● मुंबई । वीरभूमी –**

महाराष्ट्रातील ३२ जिल्हयांना दुष्काळाचा तडाखा बसला आहे. ८० टक्के तालुके पूर्णपणे दुष्काळाने प्रभावित आहेत. पिण्याच्या पाण्याची तसेच चाऱ्याची समस्या मोठया प्रमाणावर आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला केंद्राची जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीत भेट घेतली. राज्याने केंद्राला पाठविलेल्या प्रस्तावाची प्रतही त्यांना सादर केली. नियमात बसेल अशा पदधतीने महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत देण्यात येणार असल्याचे आश्वासन अमित शहा यांनी दिल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. केंद्राचे पथक ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान पाहणी करणार आहे. तसेच केंद्रिय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान देखील लवकरच महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाच्या पाहणीसाठी येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा यांची भेट घेतली. केंद्रिय गृहमंत्री हे एनडीआरएफचे अध्यक्ष असतात तसेच दुष्काळाबाबत जी मंत्रीसमिती मदतीची घोषणा करते त्या समितीचेही अध्यक्ष असतात. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्राला पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत शहा यांना सादर केली. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. केंद्रिय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी तर राज्यातील दुष्काळाची बातमी कळताच आपल्याशी स्वत:हून संपर्क केला. लागेल ती मदत महाराष्ट्राला करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान केंद्राचे पथक पाहणीसाठी येणार आहे.

## इंडिया आघाडीचे आंदोलन अराजक निर्माण करण्यासाठी

**जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । इंडिया आघाडीच्या आंदोलनावर टीका**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

इंडिया आघाडीतील नेत्यांना देशाचे संविधान आणि कायदे मान्य नाहीत. संविधानिक संस्थांवर त्यांचा विश्वास राहिलेला नाही. निवडणूक आयोगाच्या विरोधात त्यांनी सुरू केलेले आंदोलन केवळ देशात अराजक निर्माण करण्यासाठी असल्याचा आरोप जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला.

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, जनाधार गमावलेल्या लोकांचे हे आंदोलन आहे. निवडणुकांमधील पराभवानंतर केवळ आपले राजकीय अस्तित्व दाखविण्यासाठी सुरू असलेली ही धडपड असल्याची टीकाही त्यांनी केली.



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी यापूर्वी परदेशात जाऊन देशातील संविधानिक संस्थांबाबत वेळोवेळी भूमिका मांडली आहे. त्याचा संदर्भ देत इंडिया आघाडीच्या मागे जनतेचे पाठबळ नसल्याचा दावा विखे पाटील यांनी केला.

### विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे राजकीय भांडवल नको

■ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रश्नावर सुरू असलेल्या आंदोलनाबाबत बोलताना विखे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून या प्रश्नावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, काही जणांना केवळ विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे राजकीय भांडवल करायचे आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचा विद्यार्थ्यांनीही गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता असल्याचा सल्ला त्यांनी दिला.

## सरकारच्या तिजोरीवर शेतकऱ्यांचा पहिला हक्क

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे । नरेंद्र मोदींच्या गौरव अभियानातंर्गत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शिवसेनेकडून विशेष मदत**

**● परभणी । वीरभूमी –**

संपूर्ण मराठवाडा दुष्काळाच्या सावटाखाली सापडला आहे. दुष्काळाचे राजकारण करण्याची ही वेळ नाही. शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे कसे उभे राहता येईल यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. सरकारच्या तिजोरीवर शेतकऱ्यांचा पहिला हक्क आहे. त्यामुळे आपत्कालीन स्थितीत शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासह कष्टकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा संकल्प राज्य व केंद्र सरकारने सोडला आहे. शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

परभणीतील स्टेडिअम मैदानावर बुधवार, दि.७ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव अभियानाच्या अंतर्गत परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी शिवसेनेद्वारे विशेष उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी आयोजक तथा खा. संजय जाधव, खा. नागेश पाटील आष्टीकर, आ. संतोष बांगर, संपर्क प्रमुख आनंद जाधव, आ. सईद खान, माजी खा. सुरेश जाधव, माजी आ. हरिभाऊ लहाने, प्रथम महापौर प्रताप देशमुख, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, जिल्हाप्रमुख विशाल कदम, ज्येष्ठ नेते भास्कर लंगोटे, राजू कापसे, सखुबाई लटपटे, अतूल सरोदे आदी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतकरी संकटात असल्याची सरकारला जाणीव आहे. राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. शेतक-यांच्या मुलांच्या शिक्षण शुल्काचा प्रश्न, शेतीसह जनावरांसाठी पाणी पुरवठा, चारा प्रश्न दूर करण्यात येईल. सरकार मदतीसाठी आखडता हात घेणार नाही. ही दिवाळी काळी होऊ देणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. शेतकऱ्यांनो धीर सोडू नका, खचू नका. सरकारद्वारे कर्जवसूली थांबविण्यासह कर्जाचे पुनर्गठण केले जाईल. ८० टक्क्यांऐवजी आता १०० टक्के समाजकारणाचा संकल्प शिवसेनेने सोडला आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.



जिल्ह्यातील टेलपर्यंतच्या गावांना जायकवाडीचे पाणी उपलब्ध व्हावे, ६५ गावांना जायकवाडीच्या पाण्याचा लाभ मिळावा, लोअर दुधना सिंचन प्रकल्पाच्या कालव्यांची कामे पूर्ण करीत लाभक्षेत्रास पुरेपूर पाणी मिळावे, जिल्ह्यांतर्गत अन्य सिंचनाच्या व्यवस्था, पायाभूत सुविधांच्या व्यवस्थांवर हे सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

या कार्यक्रमात गरजू कुटुंबातील मुलांना सायकल, शिलाई मशीन वाटप करण्यात आले. तसेच यावेळी रुग्वाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह कष्टकरी कुटुंब व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS

## कारवाईचे आश्वासन मिळताच महेश झेंडेंचे आमरण उपोषण मागे

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील चिखली-कोरेगाव येथील ग्रामसेवक तानाजी सोनबा पानसरे यांच्याविरोधात करण्यात आलेल्या तक्रारीवर कारवाई करण्याचे आश्वासन जिल्हा परिषद प्रशासनाकडून मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते महेश भीवसेन झेंडे यांनी जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारात सुरू केलेले आमरण उपोषण मागे घेतले. ग्रामसेवक तानाजी पानसरे यांनी मुख्यालयी न राहता खोटे भाडेकरारनामे सादर करून शासकीय घरभाडे भत्ता घेतल्याचा तसेच प्रशासकीय कामकाजात अनधिकृत स्वाक्षरी व शिक्का वापरल्याचा आरोप करीत महेश झेंडे यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे तक्रार केली होती. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून, त्याचा अहवालही जिल्हा परिषद प्रशासनाकडे सादर झाल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. मात्र, कारवाई होत नसल्याने झेंडे यांनी दि. ३० सप्टेंबर २०२६ पासून जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे आमरण उपोषण सुरू केले होते. दरम्यान, जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांना पत्र देऊन संबंधित प्रकरणात पुढील नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चौकशी अहवालाच्या आधारे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे प्रशासनाकडून आश्वासन मिळाल्यानंतर महेश झेंडे यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले. या आंदोलनादरम्यान पार्थ कराळे, हुसेन शेख यांच्यासह चिखली परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षात शहरातील युवकांसह ज्येष्ठ नागरिकांचा प्रवेश

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करत शहरातील युवकांसह ज्येष्ठ नागरिकांनी पक्षात प्रवेश केला. रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली सर्जेपूरा येथील रिपाइंच्या पक्ष कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे सुशांत म्हस्के यांनी स्वागत करून त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अनिल वैरागर, पीटर लोंढे, सादिक शेख, प्रशांत आठवले, युसुफ शेख, चांद मणियार, फारूक शेख, अशोक वैरागर, अमीन सय्यद, मुन्ना शेख, मच्छिंद्र दांगट, राजू शेख, अर्जुन जव्हेरी, फिरोज शेख, आयन शेख आदींसह कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) मध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेश सोहळ्यास दानिश शेख, राहुल ठोकळ, गुलाम शेख, विजय शिरसाठ, विल्सन रुकडीकर, प्रकाश थोरात, शुभम ठोंबे, अरबाज शेख, लकी वाघमारे, योगेश जावळे, शमुवेल साळवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना सुशांत म्हस्के म्हणाले की, समाजातील तळागाळातील आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) सातत्याने संघर्ष करत आहे. वंचित, दुर्बल आणि हक्कांपासून दूर राहिलेल्या घटकांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देणे हे पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा सर्वसामान्य जनतेचा आवाज आहे. कोणत्याही भांडवलदार अथवा व्यापाऱ्यांच्या दावणीला न बांधता समाजातील शेवटच्या घटकाच्या हक्कासाठी पक्ष सातत्याने संघर्ष करत आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून आवाज उठविण्याची भूमिका पक्षाने कायम ठेवली आहे, असे म्हस्के यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, शहरातील युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने पक्षाशी जोडले जात असल्याने संघटनेला निश्चितच बळ मिळत आहे.

# विकसित भारताच्या वाटचालीत विरासत आणि विकासाचा समन्वय

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील | भाजपच्या 'विकसित भारत संकल्प सभे'त पंतप्रधान मोदींच्या २५ वर्षांच्या राजकीय वाटचालीचा गौरव




**● अहिल्यानगर | वीरभूमी –**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची २५ वर्षांची राजकीय कारकीर्द संकल्प, संघर्ष आणि राष्ट्रसेवेला समर्पित राहिली आहे. विश्वमान्य नेतृत्व म्हणून जगभरात त्यांचा गौरव होत असून, विकसित भारताची वाटचाल साध्य करताना विरासत आणि विकास यांचा योग्य समन्वय त्यांनी साधला आहे, असे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील वाटचालीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'विकसित भारत संकल्प सभा' आयोजित करण्यात आली होती. या सभेत पंतप्रधान मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

यावेळी जिल्ह्याचे प्रभारी लक्ष्मण सावजी, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, आमदार अक्षय कर्डीले, आमदार विवेक कोल्हे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग, अध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. सभेनंतर शहरातून 'सेवा ज्योत यात्रा' काढण्यात आली. विविध महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून महाविशाल गणपती मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती करण्यात आली.

### २५ वर्षांचा प्रवास हा संकल्प आणि राष्ट्रसेवेचा

पंतप्रधान मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, २५ वर्षांचा हा प्रवास केवळ एका व्यक्तीच्या राजकीय कारकीर्दीचा नाही, तर संकल्प, संघर्ष, संघटन, विकास आणि राष्ट्रसेवेच्या ध्येयाचा प्रवास आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकापासून सुरू झालेला प्रवास देशाच्या पंतप्रधानपदापर्यंत पोहोचला. प्रत्येक पदाच्या जबाबदारीत प्रशासन, विकास आणि जनसहभाग केंद्रस्थानी ठेवून काम करण्याचा आदर्श मोदी यांनी निर्माण केला, असे विखे पाटील यांनी सांगितले.

'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' हा मंत्र केंद्रस्थानी ठेवून गरीब, शेतकरी, महिला, युवक, मध्यमवर्ग, उद्योजक आणि समाजातील वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले.

### डिजिटल भारताची जगभरात ओळख

जनधन योजनेपासून डिजिटल व्यवहारांपर्यंत, तसेच घरकुल योजनेपासून आयुष्मान भारत योजनेपर्यंत विविध योजनांच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्य घटकांना लाभ मिळवून देत अंत्योदयाचा विचार प्रत्यक्षात आणण्यात आला. त्यामुळे सामान्य माणूस देशाच्या विकासप्रक्रियेशी जोडला गेला, असे विखे पाटील म्हणाले.

मोबाईल बँकिंग, डिजिटल पेमेंट, सरकारी सेवा आणि ऑनलाइन व्यवहार सर्वसामान्यांच्या हातात आले असून, यूपीआय ही भारताच्या डिजिटल क्षमतेची जगभरात चर्चिली जाणारी ओळख बनली आहे, असेही त्यांनी सांगितले.

'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून उत्पादन, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाच्या क्षेत्रात भारत अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न झाले. स्टार्टअप, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, नवीकरणीय ऊर्जा आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात भारताची स्वतंत्र ओळख निर्माण झाली असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला.

### शेतकरी, युवक आणि महिला विकासाच्या केंद्रस्थानी

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रात विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होत आहेत. युवकांच्या कौशल्याला संधी देण्यासाठी 'स्किल इंडिया', तर महिलांच्या सहभागाला विकासाची शक्ती बनविण्यासाठी 'नारीशक्ती'चा विचार पुढे आला आहे. बदलता भारत आणि जगभरातील भारताची बदलती प्रतिमा मोदी यांच्या नेतृत्वाखाली अधिक प्रभावी झाली असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

'स्टॅच्यू ऑफ युनिटी'पासून अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या उभारणीपर्यंत, तिहेरी तलाकविरोधी कायद्यापासून कलम ३७० हटविण्याच्या निर्णयापर्यंत विविध घटनांचा उल्लेख करत त्यांनी मोदी यांच्या नेतृत्वातील विकासप्रवासाचा गौरव केला.

विकसित भारताच्या निर्मितीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने कटिबद्ध व्हावे, असे आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

## श्रीगोंद्यात शासकीय रेखाकला परीक्षा उत्साहात



**● श्रीगोंदा | वीरभूमी –**

येथील महादजी शिंदे विद्यालयात २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ दरम्यान शासकीय रेखाकला परीक्षा (Elementary and Intermediate Drawing Grade Exam) उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी रंग, रेषा व आकारांच्या माध्यमातून विविध कलाकृती साकारत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी कलाशिक्षक शरद शिरसाट व कलाशिक्षक कल्याण उल्हारे यांनी विशेष परिश्रम घेतले. विकास लोखंडे, हर्षवर्धन आगळे, विकास दराडे, लालकृष्ण मुळे यांच्यासह विद्यालयातील शिक्षकांनी सहकार्य केले.

मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, उपमुख्याध्यापक शहाजी एकाड, पर्यवेक्षक सुनिता काकडे, गुरुकुल प्रमुख बापू जाधव व माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

## ग्रामीण भागाच्या विकासाला मिळणार बळ; रस्त्यांसाठी ४.०५ कोटींचा निधी मंजूर : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव | वीरभूमी–**

मतदारसंघात राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग, इतर जिल्हा मार्ग, एवढेच नाही तर शेत पानंद रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला असून उर्वरित रस्त्यांच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. याच पाठपुराव्यातून मतदारसंघातील ग्रामीण भागात मजबूत रस्ते बनवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ४.०५ कोटींचा निधी उपलब्ध केला आहे. या निधीमुळे ग्रामीण भागातील रस्त्यांचा विकास होऊन शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या वाहतुकीच्या समस्या कायमच्या सुटणार आहे.



ग्रामीण भागातील शेतमालाची वाहतूक सुरळीत व्हावी, विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा दैनंदिन प्रवास सुखकर होण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांचा राज्य शासनाकडे निधीसाठी पाठपुरावा सुरु आहे. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामासाठी ४.०५ कोटींच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. यातून काकडी येथे प्रजीमा ८४ ते तालुका हद्द रस्ता करण्यासाठी ४० लाख, कुंभारी येथे इजिमा १२३ रावसाहेब बढे वस्ती ते सुभाष बढे वस्ती रस्त्यासाठी २० लाख, माहेगाव देशमुख येथे भास्कर लांडगे वस्ती ते ग्रामा १०१ पर्यंतच्या रस्त्यासाठी ५० लाख, रवंदे येथे ५ चारी ते काळधोंडी नदी रस्ता ४० लाख, वारी येथे वारी ते जिल्हा हद्द खोपडी रस्ता ५० लाख, मढी बु. येथे वॉटर सप्लाय ते पाथरे शिव रस्ता २० लाख, वाकडी येथे गोदावरी उजवा कालवा ते जाधव- पानसरे वस्ती रस्ता ४० लाख, तळेगाव मळे येथे तळेगाव ते उक्कडगाव रस्त्यासाठी ४५ लाख, तिळवणी येथे तिळवणी ते खामगाव रस्त्यासाठी ३० लाख, धरणगाव येथे प्रजिमा ५ ब्राम्हणगाव फाटा ते प्रजिमा २१६ पर्यंतच्या रस्त्यासाठी ४० लाख, सुरेगाव येथे सुरेगाव गावठाण ते वेळापूर रस्त्यासाठी ३० लाखांचा निधी मंजूर झाला आहे.

या निधीतून मतदारसंघातील रस्ते मजबूत होणार असून शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांच्या दळणवळणाच्या अडचणी दूर होणार असल्याने आ. आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

# जिल्हा बँक निवडणुकीत अकोल्यातील राजकीय समीकरणे चर्चेत

### आ. किरण लहामटे यांचा अर्ज वैध; वैभव पिचड यांच्या अर्जावर हरकत; गायकर, नवले, वाकचौरे यांच्या भूमिकेकडे लक्ष

**● अकोले | वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी दि. ६ रोजी पूर्ण झाली. अकोले तालुक्यातील आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या उमेदवारी अर्जावर हरकत घेण्यात आली होती. त्यावर वकिलांनी केलेल्या युक्तिवादानंतर त्यांचा अर्ज वैध ठरविण्यात आला. या निर्णयाविरोधात हरकतदार पुढील कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम पा. गायकर आणि त्यांच्या कन्या संजीवनी शिंदे यांच्या उमेदवारी अर्जांवर आक्षेप घेण्याची चर्चा सुरू होती. मात्र, त्यांच्याविरोधात प्रत्यक्ष हरकत दाखल करण्यात आली नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे अकोले तालुक्यातील सोसायटी मतदारसंघातील पुढील राजकीय घडामोडींकडे लक्ष लागले आहे.

जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून प्रयत्न सुरू असल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील काही मतदारसंघांत बिनविरोध निवडीची प्रक्रिया पुढे सरकत आहे.

अकोले तालुक्यात मात्र माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे समर्थक आणि जिल्हा सहकारी बँकेचे माजी स्वीकृत संचालक मधुकरराव नवले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने त्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. दुसरीकडे सीताराम पा. गायकर आणि संजीवनी शिंदे यांनी आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याशी राजकीय मतभेद असतानाही पालकमंत्री विखे पाटील यांच्या गटाशी जवळीक साधल्याची चर्चा आहे.

भाजपचे नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य कैलासराव वाकचौरे तसेच अमृतसागर दूध संघाचे उपाध्यक्ष रावसाहेब वाकचौरे यांनीही माजी आमदार वैभवराव पिचड आणि पालकमंत्री विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या उमेदवारांबाबत वरिष्ठ पातळीवर कोणता निर्णय घेतला जातो, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.




राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे युवक जिल्हाध्यक्ष अमित भांगरे, विकासराव शेटे, बी. जे. देशमुख, बाळासाहेब नाईकवाडी तसेच शिवसेनेकडून बाळासाहेब भोर यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीपर्यंत यापैकी कोण कोण माघार घेतात, यावर पुढील चित्र स्पष्ट होणार आहे.

माजी आमदार वैभवराव पिचड यांचा बिगरशेती संस्था मतदारसंघातील उमेदवारी अर्ज ऑडिट रिपोर्टवर ऑडिट वर्ग नमूद नसल्याच्या कारणावरून अवैध ठरविण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, शिक्षण संस्थांचे लेखापरीक्षण सनदी लेखापरीक्षकांकडून केले जाते आणि सहकारी संस्थांप्रमाणे त्यांच्या ऑडिट रिपोर्टवर ऑडिट वर्ग नमूद केला जात नाही, असा पिचड समर्थकांचा युक्तिवाद आहे. त्यामुळे या निर्णयाविरोधात पिचड पुढील कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महिला मतदारसंघासाठी अकोले तालुक्यातून संजीवनी शिंदे, परिघा आरोटे आणि रेखा नवले इच्छुक आहेत. मात्र, या मतदारसंघात जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील ठरावधारक मतदान करणार असल्याने अकोलेतील उमेदवारांपैकी कोणाला संधी मिळते, हे पुढील राजकीय चर्चांवर अवलंबून राहणार आहे.

अनुसूचित जाती-जमाती राखीव मतदारसंघात अकोले तालुक्यातून माजी आमदार वैभवराव पिचड, आमदार डॉ. किरण लहामटे आणि अमित भांगरे यांच्या उमेदवारीकडे विशेष लक्ष आहे. या मतदारसंघातील अंतिम उमेदवारांची संख्या आणि माघारीनंतरचे चित्र स्पष्ट झाल्यानंतरच प्रत्यक्ष लढतीचे स्वरूप समोर येणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी एकूण ३६९ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननीनंतर २३९ अर्ज वैध ठरले असून, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २१ ऑक्टोबर आहे. त्यामुळे अकोले तालुक्यातील इच्छुकांची माघार, वरिष्ठ नेत्यांमधील समन्वय आणि स्थानिक राजकीय समीकरणे यानंतरच निवडणूक बिनविरोध होणार की प्रत्यक्ष लढत होणार, हे स्पष्ट होणार आहे.

# SPOT NEWS



## जल्लोष २०२६ वादविवाद स्पर्धात बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे यश

**● पाथर्डी । वीरभूमी –**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ व भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवक महोत्सव जल्लोष २०२६. मध्ये बाबुजी आव्हाड महाविद्यालयाने पथनाट्य, प्रहसन, मुक नाटक, पोस्टर, वादविवाद, वक्तृत्व स्पर्धेत सहभागी घेतला. विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण केले, अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. वादविवाद स्पर्धात कु. पुनम सुरेश डमाळे व ओमकार ब्राह्मदेव शिरसाठ यांनी तृतीय क्रमांक पटकावला. त्यांची विद्यापीठ स्तरावरील युवक महोत्सवासाठी निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी अभिनंदन केले. या संघाचे नेतृत्व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अशोक डोळस, डॉ. वैशाली आहेर, डॉ. आनंद घोंगडे, डॉ. अर्जुन केरकळ, प्रा. दादा बडे यांनी केले. या युवक महोत्सवात एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## ॲड. साहिल समीर बोरा यांची जितो मुंबई क्वीन्स नेकलेस युवा अध्यक्षपदी निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगरच्या मातीतून आपल्या कार्याची सुरुवात करून मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर मुंबईत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे ॲड. साहिल समीर बोरा यांची जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) मुंबई क्वीन्स नेकलेस युवा शाखेच्या अध्यक्षपदी २०२६-२०२८ या कार्यकाळासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. अधिवक्ता, आयपीओ सल्लागार तसेच भारतीय जनता युवा मोर्चा, दक्षिण मुंबईचे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या ॲड. बोरा यांच्यावर सोपविण्यात आलेल्या या जबाबदारीमुळे अहिल्यानगरच्या सामाजिक व युवा क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. ॲड. साहिल बोरा हे अहिल्यानगरचे रहिवासी असून, त्यांचे वडील समीर बोरा हे देखील सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. ते जैन ओसवाल पतसंस्थेचे विद्यमान संचालक तसेच जैन ओसवाल युवक संघाचे माजी अध्यक्ष आहेत. वडिलांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत ॲड. साहिल बोरा यांनी कायदा, व्यवसाय, सामाजिक आणि युवा क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.

## भागुबाई उगले यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी –**

तालुक्यातील डोंगरगाव येथील जुन्या पिढीतील



व्यक्तिमत्व सौ.भागुबाई कारभारी उगले यांचे नुकतेच वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पच्छात पती, दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. डोंगरगावचे माजी उपसरपंच व पत्रकार अशोक उगले, प्रगतीशील शेतकरी सोमनाथ उगले, अलका लहानू फटांगरे, जिजा दिलीप लांडगे, बेबी बाळासाहेब सहाणे व मीना कारभारी उगले यांच्या त्या मोतीश्री होत्या. त्यांच्यावर डोंगरगाव येथे आढळातीरी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# जलजीवन योजना तातडीने पूर्ण करुन टंचाईग्रस्त गावांना पाणी द्या

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सुचना । पारनेर येथे टंचाई आढावा बैठक

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील दुष्काळसदृश्य परिस्थिती, तीव्र पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि जलजीवन मिशनच्या प्रलंबित कामांचा गावनिहाय आढावा घेण्यासाठी बुधवारी (दि. ७) पारनेर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात विशेष बैठक झाली. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत टंचाईग्रस्त गावांना तातडीने पाणी उपलब्ध करून देण्यासह जलजीवन मिशनची रखडलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

बैठकीस आमदार काशिनाथ दाते सर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे,विनायक देशमुख, अशोक सावंत, सुजित झावरे, विजय औटी, डॉ.विद्या कावरे, अश्विनी थोरात, सुषमा रावडे, प्रशांत गायकवाड, गणेश शेळके, नितीन शेळके, भाऊसाहेब खिलारी, सुनील थोरात यांच्यासह विविध प्रशासकीय विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

मतदारसंघातील प्रत्येक गावाची पाण्याची गरज, उपलब्ध स्रोत तसेच चारा टंचाईची स्थिती जाणून घेऊन त्यानुसार तातडीच्या उपाययोजना करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याने टँकर, विहीर अधिग्रहण आणि अन्य पर्यायी उपाययोजनांचे नियोजन करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.





दुष्काळमुक्त आणि टँकरमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबरोबरच सध्याच्या टंचाईच्या काळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जलजीवन मिशनअंतर्गत अनेक योजना पूर्ण झाल्याची नोंद असली, तरी काही गावांमध्ये अद्याप प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झालेला नसल्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. त्यामुळे केवळ कागदोपत्री काम पूर्ण न दाखवता संबंधित योजनेचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. किरकोळ कारणांमुळे रखडलेल्या योजना तातडीने पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कामांमध्ये दिरंगाई किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची भूमिका बैठकीत व्यक्त करण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीसोबतच पिकांच्या नुकसानीचा मुद्दाही बैठकीत चर्चेत आला. पिक नुकसानीचे पंचनामे तसेच ई-पिक पाहणीमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून एकही नुकसानग्रस्त शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने वेगाने कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी केली. संकटाच्या काळात शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी शासन आणि प्रशासनाने समन्वयाने काम करावे, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे दाते यांनी स्पष्ट केले.

पाणीपुरवठा आणि विकासकामांमध्ये पारदर्शकता ठेवण्याबरोबरच ग्रामसेवक, सरपंच आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कोणताही पक्षपात न करता सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात, असे आवाहन करण्यात आले. गावकऱ्यांनीही पाणीपुरवठ्याच्या कामांमध्ये पारदर्शकता राहण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे सांगण्यात आले. तालुका ठेकेदारांच्या प्रभावापासून मुक्त ठेवण्याचा संकल्प व्यक्त करताना विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांना सुविधा मिळणे याला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या प्रवासाचा संदर्भ देत 'सेवा संकल्प अभियान' तसेच केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. 'हर घर जल', प्रधानमंत्री आवास योजना यांसारख्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांना मिळवून देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. दुष्काळमुक्तीच्या कायमस्वरूपी उपाययोजनांसोबत उपलब्ध पाण्याचा नियोजनबद्ध वापर, पाणीपुरवठा योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि गावपातळीवर प्रशासनाचा समन्वय यावर आगामी काळात भर राहणार असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले.

मतदारसंघातील दुष्काळसदृश्य परिस्थिती गंभीर असून पाणीटंचाईमुळे नागरिक, शेतकरी आणि पशुपालक अडचणीत आहेत. प्रत्येक गावाची पाण्याची गरज लक्षात घेऊन टँकर, विहीर अधिग्रहण तसेच अन्य आवश्यक उपाययोजनांचे तातडीने नियोजन करणे गरजेचे आहे. जलजीवन मिशनअंतर्गत अनेक कामे पूर्ण झाल्याचे दाखविले जात असले, तरी बहुतांश ठिकाणी पाणीपुरवठा सुरू झालेला नाही किंवा कामे अपूर्ण आहेत. ही कामे तातडीने पूर्ण करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलावे. पिक नुकसानीचे पंचनामे आणि ई-पिक पाहणीतील तांत्रिक अडचणी दूर करून एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि वेगाने कार्यवाही करावी. संकटाच्या काळात शासन आणि प्रशासन शेतकरी व जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा करू.

# कापूस किसान ॲपवर शेतकऱ्यांनी मुदतीत नोंदणी ३१ ऑक्टोबर पर्यंत करावी

## हनुमान पातकळ । कापूस खरेदीसाठी सी.सी.आय.ची तयारी

**● शेवगाव । वीरभूमी –**

कापूस हंगाम २०२६-२७ मध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या कापसाची किमान आधारभूत किंमत (एमएसपी) अंतर्गत विक्री करता यावी, यासाठी भारतीय कापूस निगम लिमिटेडमार्फत कापूस किसान हे मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे. या ॲपवर १ सप्टेंबर २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेवगाव तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी मुदतीत नोंदणी करून शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हनुमान पातकळ यांनी केले आहे.



कापूस किसान ॲपवर नोंदणी केल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत कापूस विक्रीचा लाभ घेता येणार आहे. तसेच कापूस विक्रीसंदर्भातील आवश्यक माहिती सहज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. ॲपवर नोंदणी करतांना शेतकऱ्यांनी कापूस पिकाचा पेरा असलेला सातबारा उतारा, आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक तसेच पीक पाहणीची नोंद आदी आवश्यक माहिती सोबत ठेवावी. नोंदणी प्रक्रियेत काही अडचण आल्यास शेतकऱ्यांनी सी.सी.आय.च्या व्हॉट्सप हेल्पलाइन क्रमांक ७४९९३९६६२४ वर संपर्क साधावा. तसेच कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी शेवगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी मदत सुविधा कक्षाशी संपर्क साधून नोंदणीसंदर्भात मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कापूस उत्पादकांनी कोणतीही अडचण न येता शासनाच्या हमीभावाचा लाभ मिळविण्यासाठी विहित मुदतीत कापूस किसान ॲपवर नोंदणी करावी, असे आवाहन सभापती हनुमान पातकळ यांनी केले आहे.

# अगस्ती इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांची 'बिझनेस एक्स्पो'ला भेट

## उद्योग, स्टार्टअप आणि आधुनिक तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांनी घेतली प्रत्यक्ष माहिती

**● अकोले । वीरभूमी–**

अगस्ती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर प्लिकेशन अँड रिसर्च, अकोले येथील एमबीए व एमसीए विभागातील विद्यार्थ्यांनी ३ ऑक्टोबर २०२६ रोजी लोणी येथे आयोजित 'बिझनेस एक्स्पो'ला भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध उद्योग, व्यवसाय संकल्पना आणि आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळाली.

'बिझनेस एक्स्पो'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नवीन व्यवसाय कल्पना, स्टार्टअपच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञान तसेच उद्योग क्षेत्रातील बदलते प्रवाह यांचा अभ्यास केला. शैक्षणिक ज्ञानाचा व्यावहारिक वापर कसा करता येतो, तसेच भविष्यातील व्यवसाय व करिअरच्या संधी कोणत्या आहेत, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.



यावेळी प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ. संदीप सोनवणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच नव्या व्यवसाय संकल्पनांचा अभ्यास करून उद्योजकतेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे, असे आवाहन त्यांनी केले.

या शैक्षणिक भेटीसाठी एमबीए विभागप्रमुख डॉ. गोपाल बूब, एमसीए विभागप्रमुख प्रा. अमोल नवले, तसेच प्रा. अमर खोंड, प्रा. प्रवीण पावडे, प्रा. अनुजा गोर्डे आणि सौ. आशा गोडसे यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासोबत उद्योग व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांच्यामध्ये नवोपक्रम व उद्योजकतेची दृष्टी विकसित व्हावी, या उद्देशाने या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती संस्थेचे संचालक प्रा. डॉ. प्रशांत तांबे यांनी दिली.

# यशस्वी जीवनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा हवीच : पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर प्रयत्नांची पराकाष्ठा हवीच. विद्यार्थ्यांनी मोठे ध्येय डोळ्यासमोर ठेवावे आणि ते पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत करावी. तसेच या यशाकडे जाताना ज्यांनी आपली साथ दिली, त्या आई-वडिलांना आणि गुरुजनांना कधीही विसरू नये, असे भावनिक विचार जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी व्यक्त केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे माजी प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या जयंतीनिमित्त संस्थेतील सर्व शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन बोलत होते. यावेळी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त मंडळाच्या सदस्या सुनंदाताई भालेराव, ड. गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्या आशाताई फिरोदिया, भूषण भंडारी, मीनाताई बोरा, शैलेश मुनोत, हेमंत मुथा, पुष्पाताई फिरोदिया, शाळा समिती सदस्य संजय सपकाळ, रवींद्र बाकलीवाल, जालिंदर बोरुडे, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य कैलास साबळे, अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य प्रभाकर भाबड, रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य रवींद्र भांड यांच्यासह संस्थेच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक प्रतिनिधी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया या वयातही मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षमपणे संस्थेची सर्व जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहे. त्याबद्दल पोलिस अधीक्षकांनी त्यांचे कौतुक केले. तसेच रहदारीचे नियम, कायदा व सुव्यवस्था याबद्दल फक्त पोलिसांची भूमिका नसून विद्यार्थ्यांची देखील भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना याबद्दल जागृत करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या पालकांना याबद्दल जागृत केले तर अहिल्यानगर हे कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत निश्चितच अव्वलस्थानी असेल. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या मायाजालापासून व व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.





प्रास्तविक संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले. स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध उपक्रम राबवून संस्थेच्या शाळांना प्रगतीपथावर नेले. शैक्षणिक, कला, क्रीडा धोरणांना चालना दिली. त्यांच्या ध्येयधोरणाने संस्था यशस्वी शैक्षणिक वाटचाल करत आहे. शैक्षणिक गुणवत्तेसह कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थी आघाडीवर असल्याचे छायाताई फिरोदिया यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व पाहुण्यांचा परिचय प्राचार्य कैलास साबळे यांनी करून दिला. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य प्रभाकर भाबड यांनी आभार मानले. सूत्रसंचलन वैभव वाघ, स्नेहल झांबरे यांनी केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# नांदूर निंबादैत्य येथे लोकसहभागातून चारा डेपो; ४०० जनावरांना दररोज मोफत चारा

## पाथर्डी तालुक्यातील उपक्रमाला महिन्याभरापासून प्रतिसाद | सुमारे २०० शेतकरी कुटुंबांना आधार

**पाथर्डी | वीरभूमी –** पाथर्डी तालुक्यात पाणीटंचाईबरोबरच तीव्र चारा टंचाई निर्माण झाल्याने पशुधन वाचविण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर नांदूर निंबादैत्य येथील शेतकऱ्यांनी 'बळीराजा प्रतिष्ठान'च्या माध्यमातून लोकसहभागातून चारा डेपो सुरू केला आहे. गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या या उपक्रमातून दररोज सुमारे ४०० जनावरांना मोफत हिरवा चारा उपलब्ध करून दिला जात आहे.

मागील वर्षी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले, तर यंदा पावसाअभावी शेती संकटात सापडली आहे. त्यामुळे शेतात चारा उपलब्ध नसून बाजारातही चाऱ्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे काही प्रमाणात पाणी उपलब्ध आहे, ते मका, कडवळ, घास आदी चारा पिके घेत आहेत; मात्र तीही आता संपण्याच्या मार्गावर आहेत. उसाचा दर सध्या सुमारे साडेतीन हजार रुपये प्रतिटन, तर मक्याचे दर साडेचार ते पाच हजार रुपये प्रतिटनापर्यंत पोहोचल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

नांदूर गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे स्थानिक शाखाध्यक्ष विकास वाघ यांनी शिवाजी नरसाळे, साईनाथ वाघ, विश्वास देशमुख, अर्जुन ढोले यांच्यासह सुमारे १० ते १५ कार्यकर्त्यांशी चर्चा केली. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन असलेल्या दुग्ध व्यवसायाला आधार देण्यासाठी पशुधन वाचविणे आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन लोकसहभागातून चारा डेपो सुरू करण्याची कल्पना पुढे आली.

बैलपोळ्याच्या दिवशी गावात हा चारा डेपो सुरू करण्यात आला. पाथर्डी बाजार समिती, चारा बाजार, परिसरातील खासगी शेतकरी आणि ऊस उत्पादकांकडून दररोज चार ते पाच टन चारा खरेदी केला जातो. प्रत्येक जनावरासाठी २० किलो चारा वाटप करण्यात येत असून, एका शेतकऱ्याच्या दोन जनावरांना मोफत चारा दिला जातो.

सध्या सुमारे २०० शेतकरी या उपक्रमाचा लाभ घेत असून, गावातील सुमारे ४०० जनावरांना दररोज ताजा हिरवा चारा मिळत आहे. कार्यकर्त्यांचा सेवाभावी उपक्रम पाहून परिसरातील व्यावसायिक आणि शेतकरीही मदतीसाठी पुढे आले आहेत. पाथर्डीच्या सुवर्ण युग तरुण मंडळाने गणेशोत्सवादरम्यान एका दिवसाचा चारा मोफत उपलब्ध करून दिला.

विकास वाघ यांनी सांगितले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची शेवगाव येथे भेट घेऊन नांदूर गावातील टंचाईच्या तीव्र परिस्थितीची माहिती देण्यात आली. बंद असलेली विहिरींची कामे सुरू करावीत, मनरेगा अंतर्गत शिवार रस्ते व पानंद रस्त्यांची कामे तातडीने सुरू करावीत, वैयक्तिक विहीर योजना पुन्हा सुरू करून पात्र शेतकऱ्यांना अनुदान द्यावे आणि लोकसहभागातून सुरू असलेल्या चारा डेपोला मदत करावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबत पालकमंत्र्यांनी सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिल्याचे वाघ यांनी सांगितले.

नांदूर येथील निंबादैत्य देवस्थान आणि चारा डेपोला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार मोनिका राजळे यांनी भेट द्यावी,



अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे. चारा डेपोचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी दानशूर व सक्षम व्यक्तींनी चारा किंवा आर्थिक स्वरूपात मदत करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

ज्येष्ठ शेतकरी आसाराम देशमुख म्हणाले, बळीराजा प्रतिष्ठानकडून आमच्या जनावरांना मोफत चारा दिला जात आहे. बैलपोळ्याच्या दिवशी चारा उपलब्ध झाल्याने जनावरे सांभाळण्याची आमची चिंता काही प्रमाणात दूर झाली. पोटच्या मुलाप्रमाणे आम्ही जनावरांना जपतो. अन्न-पाण्याविना जनावरे त्रस्त होताना पाहून मन हेलावते. चारा डेपो आणि कार्यकर्त्यांच्या सेवाभावी उपक्रमामुळे आम्हाला जगण्याचे बळ मिळाले आहे.

डेपोच्या माध्यमातून आतापर्यंत चाऱ्याच्या बदल्यात कोणत्याही लाभार्थ्याकडून पैसे घेण्यात आले नसल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे नांदूर येथील लोकसहभागातून सुरू असलेल्या चारा डेपोकडे लक्ष वेधले आहे. तीव्र दुष्काळी परिस्थितीत पशुधन वाचविण्यासाठी सुरू असलेला हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश, रामपूरवाडीतील गावठाण फिडरचे रखडलेले काम पुन्हा सुरू

**कोपरगाव | वीरभूमी–** राहाता तालुक्यातील रामपूरवाडी गावासाठी मंजूर असलेल्या ११ केव्ही गावठाण फिडरच्या लिंक लाईनचे गेल्या दोन वर्षांपासून रखडलेले काम अखेर पुन्हा सुरू झाले आहे. गावातील वीजपुरवठ्याची समस्या दूर करण्यासाठी रामपूरवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने २९ जून २०२६ रोजी पत्रव्यवहार करून स्वतंत्र गावठाण फिडरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्याकडे करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत आ. कोल्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून रखडलेले काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

रामपूरवाडी गावासाठी अंदाजे सहा किलोमीटर लांबीची ११ केव्ही गावठाण फिडर लिंक लाईन मंजूर करण्यात आली आहे. या कामाला २०२४ मध्ये सुरुवात झाली होती. मात्र, विविध अडचणींमुळे गेल्या दोन वर्षांपासून काम रखडले होते. सध्या गावासाठी जुनी ११ केव्ही कृषी वीजवाहिनी कार्यरत असून, लोडशेडिंग आणि ओव्हरलोडमुळे या वाहिनीवर वारंवार फॉल्ट होत असल्याने ग्रामस्थांना वीजपुरवठ्याच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



स्वतंत्र गावठाण फिडरचे काम पूर्ण झाल्यानंतर रामपूरवाडीतील सुमारे ५०० घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना त्याचा लाभ मिळणार आहे. स्वतंत्र फिडरमुळे कृषी वीजवाहिनीवरील भार कमी होऊन गावातील वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

फिडरचे काम सुरू असताना रेल्वे क्रॉसिंग तसेच स्थानिक शेतकऱ्यांच्या अडचणी निर्माण झाल्याने मागील दोन दिवसांपासून काम बंद होते. ही बाब आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता, संगमनेर तसेच एनसीसीच्या प्रोजेक्ट मॅनेजर यांच्याशी फोनवरून चर्चा केली. संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पाठवून अडचणी दूर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

दिवाळीपूर्वी कोणत्याही परिस्थितीत गावठाण फिडरचे काम पूर्ण झाले पाहिजे आणि दिवाळीपर्यंत रामपूरवाडीतील नागरिकांना स्वतंत्र गावठाण वीजपुरवठा मिळाला पाहिजे, अशा स्पष्ट सूचना आ. कोल्हे यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच रेल्वे क्रॉसिंगच्या अडचणीबाबत पुणतांबा येथील रेल्वे अधिकाऱ्यांशी आणि स्थानिक शेतकऱ्यांशी चर्चा करून कामासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यानंतर स्थानिक शेतकऱ्यांनीही सहकार्याची भूमिका घेतल्याने बंद असलेले काम पुन्हा सुरू झाले.

गावठाण फिडरचे काम पुन्हा सुरू झाल्याने रामपूरवाडी ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. रखडलेले काम तातडीने सुरू करून दिवाळीपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्याबद्दल सतीश आप्पा जगताप, मच्छिंद्र शिंदे, मच्छिंद्र गोरे, मनोज साळुंखे, विलास आंबडकर, सुभाष सांबारे, आसाराम आग्रे, शिवनाथ गायके, दत्तात्रय सांबारे, अमोल लोंढे, शिवा थोरात, रवींद्र नळे, अजय धनवटे, सतीश गिरे, अविनाश लोंढे, अभिराज शिंदे, विनायक आग्रे, बाळासाहेब धनवटे आदींनी आ. विवेकभैय्या कोल्हे यांचे आभार व्यक्त केले.

या कामासाठी कार्याध्यक्ष बबनराव काळे, उपसरपंच मंदाताई काळे, सोसायटीचे व्हाईस चेअरमन चंद्रभान भोरकडे पाटील, लहानु वडणे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रकाशजी शेळके, संजीवनी युवा प्रतिष्ठानचे युवा सेवक प्रसादजी काळे, विनायक धनवटे आदींनीही पाठपुरावा व सहकार्य केले. संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून फिडरच्या कामाला पुन्हा गती मिळाली असून, दिवाळीपूर्वी काम पूर्ण होऊन गावाला स्वतंत्र वीजपुरवठा मिळण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# दिवाळीपूर्वी पेन्शनसह वेतन आयोगाचे थकीत हप्ते द्या; अन्यथा १३ ऑक्टोबरपासून महापालिकेत पेन्शनर्सचे धरणे आंदोलन

**अहिल्यानगर | वीरभूमी–** नगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ५व्या वेतन आयोगाचे थकीत फरकाचे हप्ते, ६व्या वेतन आयोगाचे संपूर्ण आठ हप्ते तसेच नियमित पेन्शन दिवाळीपूर्वी देण्यात यावी, अशी मागणी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांबाबत प्रधान सचिव, महापालिका आयुक्त, महापौर व उपमहापौर यांना नोटीस देण्यात आली असून, मागण्यांवर दि. १२ ऑक्टोबरपर्यंत कार्यवाही न झाल्यास दि. १३ ऑक्टोबरपासून महापालिकेसमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. ७ ऑक्टोबर) कास्ट्राईबच्या जिल्हा परिषद येथील कार्यालयात संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दिवाळीचा सण तोंडावर असताना अनेक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाची थकीत रक्कम आणि वेळेवर पेन्शन मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, महापालिकेतील सेवानिवृत्त ५०६ कर्मचाऱ्यांना न्यायालयीन निर्णयानुसार ५व्या वेतन आयोगाचा फरक मिळणे अपेक्षित आहे. तसेच ६व्या वेतन आयोगाचे आठ हप्ते अद्याप प्रलंबित असून, त्याची अंदाजे रक्कम ६० ते ६५ लाख रुपये आहे. ही संपूर्ण थकीत रक्कम दिवाळीपूर्वी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेतील कायम कर्मचाऱ्यांना ११ हजार रुपये बोनस व सानुग्रह अनुदान एकरकमी देण्याबाबत निर्णय घेतल्याबद्दल संघटनेने प्रशासनाचे आभार मानले. मात्र, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतन आयोगाच्या रकमेबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा वेळेवर पेन्शन मिळत नसल्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. पेन्शन उशिरा मिळत असल्यामुळे औषधोपचार, दैनंदिन खर्च आणि इतर गरजा भागविताना पेन्शनर्सना अडचणी येत असल्याचे संघटनेने नमूद केले. त्यामुळे दरमहा पेन्शनची रक्कम प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मागण्यांवर दि. १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सकारात्मक कार्यवाही करावी, अन्यथा दि. १३ ऑक्टोबरपासून महापालिका कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नोटीसमधून देण्यात आला आहे. आंदोलनाची पुढील दिशा बैठकीत निश्चित करण्यात आली. बैठकीस वसंत थोरात, अन्वर शेख, आर. जी. शेख, नवनाथ भालेराव, वसंत गायकवाड, राजेंद्र सस्कर, रामदास वखारे, विलास भिंगारदिवे, डी. एम. फडके, अनिस पठाण, रविंद्र गणगळे, मिलिंद वैद्य, आर. के. गावडे, ए. ए. देशपांडे, संजय मुठाळ, दिगंबर टेपाळे, विनोद शिंदे, दिलीप पाठक आदींसह सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अण्णा हजारे यांच्या जलसंधारणाच्या सूचनांची अंमलबजावणी करणार

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील | दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे यांची राळेगणसिद्धीत घेतली भेट

**अहिल्यानगर | वीरभूमी–** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीत पाणीटंचाई, दुष्काळी परिस्थिती आणि भविष्यातील जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली.

मुंबईतील रुग्णालयात उपचार घेत असताना अण्णा हजारे यांची यापूर्वी भेट घेतली होती. उपचारानंतर ते पुन्हा राळेगणसिद्धी येथे परतल्याचे समजल्यानंतर पारनेर येथील टंचाई आढावा बैठक आटोपून मंत्री विखे पाटील यांनी गावातील यादवबाबा मंदिरात त्यांची भेट घेतली. यावेळी विनायक देशमुख, सुजित झावरे आणि अशोकराव सावंत उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची चौकशी केली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने दोघांमध्ये चर्चा झाली. शासनाकडून सुरू असलेल्या उपाययोजनांची माहितीही विखे पाटील यांनी अण्णा हजारे यांना दिली.

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याची गरज अण्णा हजारे यांनी व्यक्त केली. गावागावांत पाणी अडवणे, पाणी जिरवणे, नाला खोलीकरण, बंधारे उभारणे, गाळ काढणे तसेच उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन यावर सातत्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर वाहून जाण्याऐवजी ते स्थानिक पातळीवर अडवून भूजलपातळी वाढविण्यासाठी व्यापक प्रयत्न होणे आवश्यक आहे. जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता लोकसहभागातून व्यापक चळवळ उभी राहिली पाहिजे, असेही अण्णा हजारे यांनी स्पष्ट केले.

राळेगणसिद्धीमध्ये यापूर्वी झालेली जलसंधारणाची कामे, वृक्षलागवड आणि पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे आजही गावातील वनराई टिकून असल्याचे विखे पाटील यांनी नमूद केले.

आजची दुष्काळी परिस्थिती ही भविष्यातील जलव्यवस्थापनाचे धडे देणारी आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब अडविणे आणि जिरविण्यासाठी गावपातळीवर नियोजन करून जलसंधारणाच्या कामांना गती देणे आवश्यक आहे, हा अण्णा हजारे यांचा विचार शासन कृतीत उतरविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न



केले जातील, अशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.

दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर आणि लोकसहभाग या तीन बाबींना केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक गावात कामे करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.